SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-5 *



४. अशारितीने मे.महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार व लिहून देणार यांच्या मालकीच्या असलेल्या व नाशिक महानगरपालिकेस खरेदी दिलेल्या क्षेत्रासाठी एकुण १३७८६.00 चौ.मी.हस्तांतरणीय विकास हक्काचे क्षेत्र लिहून देणार यांच्या कडे मालकी हक्काने आलेले आहे. सदर टीडीआर क्षेत्राची लिहून देणार यांना विक्री विल्हेवाट करण्याचा मालक या नात्याने संपुर्ण हक्क व अधिकार आहे. सदर टीडीआर क्षेत्राची लिहून देणार यांना विक्री विल्हेवाट करण्याचा मालक या नात्याने संपुर्ण हक्क व अधिकार आहे.

येणेप्रमाणे नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे कडील दिनांक १३.०५.२०१९ रोजी सर्टिफिकेट क्रमांक ८३४ हया टीडीआर सर्टिफिकेट मधील संपुर्ण टीडीआर क्षेत्र हे लिहून देणार यांचे मालकीचे असुन सदरचे क्षेत्र विक्री करण्याचा लिहून देणार यांना कायदेशिर हक्क व अधिकार प्राप्त झालेला आहे. त्यानुसार लिहून देणार हे सदर सर्टिफिकेट पैकी २८१.०१ चौ.मी.टीडीआर क्षेत्र लिहून घेणार यांना हस्तांतर करण्याचे ठरवुन प्रस्तुतचा टीडीआर हस्तांतर केल्याचा कायम स्वरूपी खरेदीखताचा दस्त आज रोजी लिहून व नोंदवुन देत आहे.

५. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक मध्ये उपविभाग दिनांक २८.०१.२०१६ अन्वये ट्रान्सफर ऑफ डेव्हलपमेंट राईटच्या परिशिष्ट वी मध्ये ५.0 नियमाच्या वापर हस्तांतरणीय हक्काचे (टीडीआर) ५.३ नियमाप्रमाणे लिहून घेणार यांचे मालकीच्या मिळकतीचे वाजार मुल्यांकन हा खाली नमुद केल्याप्रमाणे आहे. तसेच लिहून देणार यांचे टीडीआर सर्टिफिकेट क्रमांक ८३४ दिनांक १३.०५.२०१९ मध्ये मुल्यांकन दर रूपये १३८२०/- प्रति चौ.मी. असे आहे.

Scanned by CamScanner

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-5 *
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-५



लिहून घेणार यांनी खरेदी घेतलेले क्षेत्र मौजे देवळाली येथील सर्व्हे नंबर ११/१अ/१अ/१/२/३/१ मधील प्लॉट नं.१८ यांसी क्षेत्र ६९५.00 चौ.मी. यांसी सिटी सर्व्हे नंबर ३९७८ पैकी या मिळकतीवर टीडीआर क्षेत्र वापरावयाचे आहे. सदर मिळकतीचे वाजार मुल्यांकन दर रूपये १३९७0/- प्रति चौ.मी. आहे. तसेच लिहून घेणार यांना लागणारा टीडीआर २७८.00 चौ.मी.आहे.

त्याप्रमाणे $\frac{२७८ \times १३९७0}{१३८२0} = २८१.0१$ चौ.मी.

लिहून घेणार यांनी खरेदी घेतलेले टीडीआर क्षेत्र २७८.00 चौ.मी.आहे. मात्र वरील सुत्राप्रमाणे खरेदीखतात २८१.0१ चौ.मी.नमूद करण्यात आलेले आहे.

६. माहूरगड को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.नाशिक तर्फे लिहून देणार नं.१ चेअरमन व सेक्रेटरी तसेच लिहून देणार नं.२ सर्व सभासद यांनी मौजे देवळाली येथील सर्व्हे नंबर ११/१अ/१अ/१/२/३/१ मधील प्लॉट नं.१८ यांसी क्षेत्र ६९५.00 चौ.मी. यांसी सिटी सर्व्हे नंबर ३९७८ पैकी ही मिळकत मे.नाईस होम तर्फे भागीदार श्री.निलेश सुरेश शिंदे व इतर यांना दिनांक १0.0५.२0१९ रोजीच्या विकसन करारनामा व जनरल मुखत्यारपत्र दस्तान्वये विकसीत करणेकामी दिलेली असून सदरचे दस्त मे.दुय्यम निवंधक साहेव, नाशिक-१ यांचे कार्यालयात अनुक्रमे दस्त नंवर ३१७८ व ३१७९ अन्वये नोंदवून दिलेले आहेत.

७. या खरेदीखताने लिहून घेणार यांनी खरेदी घेतलेले क्षेत्र २८१.0१ चौ.मी. टीडीआर क्षेत्राचे ते मालक झालेले असुन सदरचे टीडीआर क्षेत्र लिहून घेणार हे त्यांच्या इतर मिळकतीवर वापरू शकतात, जर लिहून घेणार यांना खरेदी दिलेले टीडीआर क्षेत्र कोठेही वापरावयाचे नसल्यास अशावेळी सदर खरेदीखताने मिळालेल्या हक्क व अधिकारात लिहून घेणार यांना खरेदी दिलेले हस्तांतरणीय

Scanned by CamScanner

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-5 *
दस्त क्र. ५८८ / २०१९
७ / १०

विकास हक्क क्षेत्र लिहून घेणार हे तिऱ्हाईत इसमांना विक्री करू शकतात, लिहून घेणार यांनी केलेल्या कायदेशिर कारवाईस लिहून देणार यांची संमती राहील.

८. वर विस्तृतरित्या नमुद केल्याप्रमाणे टीडीआर खालील आरक्षित क्षेत्राचे मोवदल्यात नाशिक महानगरपालिका यांचे नियमानुसार लिहून देणार यांना मिळालेल्या एकुण टीडीआर क्षेत्रापैकी २८१.0१ चौ.मी.एवढे क्षेत्र लिहून देणार हे लिहून घेणार यांचे लाभात या खरेदीखताने कायमस्वरूपी लिहून व नोंदवुन देत आहोत. सदर टीडीआर क्षेत्राची किंमत रूपये ६,00,000/- (अक्षरी रक्कम रूपये सहा लाख मात्र) एवढी ठरविण्यात आलेली आहे. सदरची किंमत वाजार भावाप्रमाणे योग्य व बरोबर आहे.

९. लिहून देणार यांना लिहून घेणार यांचेकडून टीडीआर क्षेत्राच्या किंमतीचा संपुर्ण भरणा खालीलप्रमाणे मिळालेला आहे.

| रक्कम रूपये | तपशिल |
|---|---|
| रू.६,00,000/- | अक्षरी रक्कम रूपये सहा लाख मात्र लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिनांक 0९.0७.२0१९ रोजीचा युनियन बँक ऑफ इंडिया, सौभाग्य नगर, लँम रोड, नाशिक शाखेवरील चेक नंवर 0४६८५२ अन्वये दिले. |
| रू.६,00,000/- | अक्षरी रक्कम रूपये सहा लाख मात्र |

वरीलप्रमाणे ठरलेल्या किंमतीचा संपुर्ण भरणा लिहून देणार यांना लिहून घेणार यांचेकडून मिळाला असुन त्यावावत लिहून देणार यांची कोणतीही तक्रार नाही.

१०. या खरेदीखताने हस्तांतर केलेल्या (टीडीआर) हस्तांतरणीय विकास हक्क लिहून घेणार यांनी नाशिक महानगरपालिका, नगररचना विभाग यांनी ठरवुन दिलेल्या व

Scanned by CamScanner

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 * NASIK-5 *
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-५
नसक-५
दस्त क्र. ८९६५ /२०२१
७८ / ९८

घालुन दिलेल्या अटी व शर्तीनुसार लिहून घेणार यांनी त्यांचे नियोजित बांधकामावर वापरावयाचे आहे व नाशिक महानगरपालिकेच्या नियमानुसार सदर टीडीआर क्षेत्राचा वापर करावयाचा आहे. कोणत्याही परिस्थितीत लिहून घेणार यांनी नियमांचे विरूद्ध हस्तांतरणीय विकास हक्काचा वापर करावयाचा नाही असे केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी लिहून घेणार यांची राहील.

११. प्रस्तुत खरेदीखताने/हस्तांतर केलेल्या क्षेत्राचेच (टीडीआर) हस्तांतरणीय विकास हक्क सर्टिफिकेट मधुन वजा करून त्या ठिकाणी लिहून घेणार यांचे अगर लिहून घेणार हे सांगतिल त्या नावाने वर्ग झाल्याबाबत नोंद करणेसाठी जरूर तो अर्ज करार, संमती लिहून देणार हे लिहून देतील. मात्र त्याकामी नाशिक महानगर पालिका यांचेकडे जाऊन योग्य ती सर्व कारवाई व खर्च हा लिहून घेणार यांनी करावयाचा आहे.

१२. वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत १८ मीटर व ३० मीटर रूंद डीपी रोडसाठी आरक्षित आहे. याशिवाय सदर टीडीआर क्षेत्रावर लिहून देणार यांचेशिवाय कोणाचाही हक्क व अधिकार नाही. सदर टीडीआर क्षेत्रावर लिहून देणार यांनी कोणताही बोजा निर्माण केलेला नाही. सदर टीडीआर विक्री, विल्हेवाट, हस्तांतर करू नये असा कोणत्याही कोर्टाचा अथवा सक्षम अधिकाऱ्याचा अंतिम अथवा अंतरिम मनाई हुकुम अगर आदेश नाही.

१३. या खरेदीखताने हस्तांतर केलेल्या टीडीआर क्षेत्रापेक्षा म्हणजेच २८१.०१ चौ.मी. यापेक्षा जास्त टीडीआर क्षेत्र लिहून घेणार यांनी वापरावयाचे नाही व तसा अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेला नाही.

Scanned by CamScanner

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-5

१४. सदर खरेदीखत करणेकामी व नोंदविणेकामी त्याचप्रमाणे टीडीआर हस्तांतर करणेकामी तो वापरणेकामी जो काही खर्च करावा लागेल तो सर्व खर्च लिहून घेणार यांनीच करावयाचा व सोसावयाचा आहे.

१५. लिहून देणार हे या कायमच्या खरेदीखताव्दारे असे जाहीर व कबुल करतो की, या कायमच्या खरेदीने हस्तांतरीत केलेल्या टीडीआर क्षेत्राचे हक्क लिहून देणार हे कोणासही वर्ग करणार नाहीत.

१६. सदर खरेदीखत हे लिहून देणार तसेच लिहून घेणार यांचेवर तसेच ज्याचे त्याचे वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील.

येणेप्रमाणे हे हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) हस्तांतर केल्याचे कायमचे फरोक्त खरेदीखत-लिहून देणार यांनी राजीखुशीने व स्वसंतोषाने लिहून दिले व त्यानंतर मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक यांचे कार्यालयात नोंदवुन दिले असे.

हे टि.डी.आर.खरेदीखत.

नाशिक.



माहूरगड को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.नाशिक

१) तर्फे चेअरमन श्री.रितेश राजकुमार कोठाडीया

२) तर्फे सेक्रेटरी श्री.पुंडलिक सयाजी टर्ले

तर्फे जनरल मुखत्यार म्हणुन

मे.नाईस होम तर्फे भागीदार श्री.निलेश सुरेश शिंदे

(लिहून घेणार)

Scanned by CamScanner